# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२



www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » शनिवार, दि. 11 जुलै 2026 | पान- 1


# महापालिकेची हलगर्जी गरीब रुग्णांच्या 'उपचारां'वर बेतली : आमदार शंकर जगताप

## आमदार शंकर जगताप यांच्या तारांकित प्रश्नावर विधानसभेत सरकारचा धक्कादायक खुलासा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने शहरातील बड्या खाजगी रुग्णालयांना कोट्यवधी रुपयांचा वाढीव एफएसआय मंजूर केला खरा, मात्र असे करताना गरीब व गरजू रुग्णांसाठी मोफत खाटा राखीव ठेवण्याची अत्यंत महत्त्वाची अट करारात घालण्यास महानगरपालिका प्रशासन विसरल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. चिंचवड विधानसभेचे आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत विचारलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना राज्य सरकारने ही धक्कादायक वस्तुस्थिती मान्य केली आहे.

पिंपरी मनपाच्या या अक्षम्य निष्काळजीपणामुळे शहरातील गरीब रुग्णांना हक्काच्या मोफत उपचारांपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे भविष्यात रुग्णालयांना जागा, वाढीव एफएसआय देताना 'मोफत खाटां'ची अट सक्तीची करण्याची मागणी आमदार जगताप यांनी यावेळी केली. पिंपरी चिंचवड शहरातील खाजगी रुग्णालय व धर्मादाय रुग्णालयांमध्ये गरीब रुग्णांसाठी राखीव ठेवण्यात आलेल्या मोफत खाटांबाबतचा प्रश्न आमदार शंकर जगताप यांनी शुक्रवारी उपस्थित केला होता. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावर उत्तर दिले.

पुणे महानगरपालिकेच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवड शहरातील खाजगी रुग्णालयांना अतिरिक्त एफएसआय देताना गरीब रुग्णांसाठी मोफत अथवा अल्प दरात उपचार देणे बंधनकारक असणे अपेक्षित होते. मात्र, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार बिर्ला हॉस्पिटल (थेरगाव) आणि डी. वाय. पाटील हॉस्पिटल (पिंपरी) यांना वाढीव एफएसआय मंजूर केला, पण वरील नियमावलीत गरीब रुग्णांसाठी मोफत खाटा राखीव ठेवण्याची कोणतीही अटच नमूद केली नाही.




### माहितीच्या अधिकारात धक्कादायक आकडेवारी उघड

» आमदार शंकर जगताप यांनी शुकवारी विधानसभेत खाजगी रुग्णालयांच्या मनमानी कारभारावर कडक शब्दांत बोट ठेवले. पुण्यात अतिरिक्त एफएसआयच्या बदल्यात मोफत खाटांची अट कागदावर असूनही प्रत्यक्षात रुग्णालयांकडून या सुविधेचा वापर अत्यंत नगण्य होत असल्याचे उघड झाले आहे.रुबी हॉल क्लिनिकने तीन वर्षांत केवळ ७२ गरीब रुग्णांवर उपचार केले. सह्याद्री हॉस्पिटलने तीन वर्षांत केवळ ७९ रुग्णांवर उपचार केले. के. के. आय. इन्स्टिट्यूट: तीन वर्षांत केवळ ७५ रुग्णांवर उपचार केले. औंध येथील 'इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स' आणि 'एम्स' रुग्णालयामध्येही गरीब रुग्णांना या सुविधेचा अत्यल्प लाभ देण्यात आल्याचे माहितीच्या अधिकारात निदर्शनास आले आहे.

> "पिंपरी-चिंचवड मनपाने अनेक खाजगी रुग्णालयांना कोट्यवधींचा वाढीव एफएसआय दिला, पण गरिबांच्या मोफत उपचारांची अट घालायलाच प्रशासन विसरले, ही अत्यंत धक्कादायक आणि गंभीर बाब आहे. मनपाच्या या अक्षम्य निष्काळजीपणामुळे शहरातील गरीब व गरजू रुग्ण हक्काच्या मोफत उपचारांपासून वंचित राहिले आहेत. बिर्ला आणि डी. वाय. पाटील रुग्णालयाच्या या करारांची तात्काळ फेरचौकशी करून त्यात मोफत खाटांची अट सक्तीची करण्यात यावी. भविष्यात कोणत्याही रुग्णालयाला जागा किंवा वाढीव देताना ही अट बंधनकारक असायलाच हवी; अन्यथा संबंधित रुग्णालयांवर कडक कारवाई झाली पाहिजे."
>
> - शंकर जगताप, आमदार चिंचवड विधानसभा

# निगडीतील भक्ती-शक्ती उड्डाणपुलाला मोठे भगदाड; तातडीने दुरुस्तीची मागणी

## पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन उड्डाणपुलाची दुरुस्ती करावी, अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

निगडी येथील भक्ती-शक्ती उड्डाणपुलाच्या गोलाकार भागात मुसळधार पावसानंतर मोठे भगदाड पडण्यात आले असून, यामुळे नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाने तातडीने दखल घेऊन उड्डाणपुलाची दुरुस्ती करावी, अशी मागणी भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केली आहे.



महात्मा बसवेश्वर पुतळा ते अंकुश चौक निगडी ग्रेड सेपरेटर मार्गावरील वाहतूक सुरक्षेच्या दृष्टीने तात्पुरती बंद करण्यात यावी, तसेच पुलाची तांत्रिक तपासणी करून आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

सचिन काळभोर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, भक्ती-शक्ती उड्डाणपुलाचे बांधकाम सन २०१८ ते २०२० या कालावधीत सुमारे १४५ कोटी रुपये खर्च करून करण्यात आले होते. या प्रकल्पासाठी ठेकेदार कंपनीला १८ महिन्यांचा कालावधी देण्यात आला होता. मात्र, त्यानंतर सहा महिन्यांची मुदतवाढही देण्यात आली होती. पुलाचे बांधकाम निकृष्ट दर्जाचे झाल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

यापूर्वीही उड्डाणपुलावर अशाच प्रकारचे भगदाड पडल्याची घटना घडली होती. त्यावेळी संबंधित ठेकेदार कंपनीविरोधात कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, त्याकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोपही काळभोर यांनी केला आहे.

दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसामुळे पुन्हा एकदा पुलाच्या गोलाकार भागात भगदाड पडल्याचे समोर आले असून, भविष्यात मोठी दुर्घटना टाळण्यासाठी पुलाची तातडीने दुरुस्ती करण्यात यावी आणि आवश्यक असल्यास तो धोकादायक घोषित करण्याचा विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, महानगरपालिका प्रशासनाने त्वरित कारवाई न केल्यास भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून आंदोलन करतील, असा इशाराही सचिन काळभोर यांनी दिला आहे. प्रशासनाच्या भूमिकेकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# दोषी कोण? शिक्षा कोणाला? कविता आल्हाट पाटील यांचा संतप्त सवाल

## पूर्वसूचना देऊनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा आरोप; बायोमायनिंगमधील तांत्रिक त्रुटी आणि निष्काळजीपणामुळेच दुर्घटना घडल्याचा दावा



**पिंपरी | प्रतिनिधी**

मोशी: मोशी कचरा डेपो येथील दुर्घटना अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर आहे, त्याला सर्वस्वी महापालिका प्रशासनाचा ढिसाळ आणि बेजबाबदार कारभार कारणीभूत असल्याचा थेट आणि संतप्त आरोप राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महिला शहराध्यक्षा कविता ताई आल्हाट यांनी केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराचा संपूर्ण कचरा मोशी येथील कचरा डेपोत गेल्या ३५ वर्षांपासून साठवला जात असून, या ठिकाणी कचऱ्याचे अजस्त्र डोंगर उभे राहिले आहेत. या कचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी महापालिकेने वेस्ट टू एनर्जी, हॉटेल वेस्ट टू सीएनजी, प्लास्टिकपासून इंधन व कच्चा माल, ओल्या कचऱ्यापासून खत निर्मिती तसेच बांधकाम रॅबरो कचऱ्यापासून वाळू, खडी व पेव्हिंग ब्लॉक्स तयार करणे यांसारखे अनेक महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभारल्याचा दावा केला होता. मात्र, या प्रकल्पांमधील तांत्रिक त्रुटी, चुकीचे व्यवस्थापन आणि प्रशासकीय दिरंगाईमुळे अखेर हा अनर्थ ओढवला असून वेस्ट टू एनर्जी कार्यालयाची इमारत कोसळून कर्मचाऱ्यांचा नाहक बळी गेल्याने संपूर्ण परिसरात तीव्र संताप व्यक्त होत असल्याचेही त्यांनी सांगितले.

या संपूर्ण प्रकल्पातील तांत्रिक त्रुटींवर बोट ठेवताना कविता ताई आल्हाट यांनी प्रशासनाला धारेवर धरले. महापालिकेने कचऱ्याचा डोंगर हटवण्यासाठी कोट्यवधी रुपयांचा खर्च करून बायोमायनिंगचे प्रकल्प सुरू केले होते. शहराच्या वाढत्या लोकसंख्येमुळे दररोज हजारो टन कचरा या डेपोत नव्याने जमा होतो. बायोमायनिंगचे काम वेळेत पूर्ण न होणे आणि कचऱ्याचे योग्य वर्गीकरण न करताच डोंगर उभे करणे, कचऱ्याचा डोंगर आणि इमारतीत केवळ 30 मीटरचे अंतर ठेवणे, इमारतीच्या दुप्पट उंचीचे कचऱ्याचं ढीग उभं करणे या प्रकल्पातील सर्वात मोठ्या तांत्रिक चूक होत्या, ज्याचा परिणाम म्हणून अखेर संपूर्ण डोंगर खचला आणि निष्पाप लोकांचा बळी गेला.

आल्हाट यांनी पुढे सांगितले की, त्या स्वतः २०२२ पासून या गंभीर समस्येचा सातत्याने पाठपुरावा करत होत्या. त्यांनी महापालिकेचे तत्कालीन आयुक्त शेखर सिंह यांच्याशी प्रत्यक्ष भेटून आणि या संदर्भात अनेकदा लेखी स्मरण पत्रे देऊन येथील वाढत्या धोक्याकडे महापालिकेचे लक्ष वेधले होते. प्रशासनाने या विषयाकडे गांभीर्याने पहावे आणि वेळीच उपाययोजना कराव्यात, असा वारंवार सल्लाही त्यांनी दिला होता. अत्यंत धक्कादायक बाब म्हणजे, ही भीषण दुर्घटना घडण्याच्या अवघ्या 3 दिवसांपूर्वीच येथील कचरा ढासळत असल्याची स्पष्ट आणि तातडीची माहिती स्थानिक स्तरावरून प्रशासनाकडे पोहोचवण्यात आली होती. परंतु, नेहमीप्रमाणे ढिम्म राहिलेल्या प्रशासनाने केवळ काही प्रमाणात कचरा हटवून वरवरची आणि तात्पुरती मलमपट्टी करून या संवेदनशील विषयाची दखल घेतली नाही.

जर प्रशासनाने अगदी तीन दिवसांपूर्वी मिळालेल्या त्या पूर्वसूचनेनंतर गांभीर्याने आणि युद्धपातळीवर उपाययोजना केल्या असत्या, तर आज इतकी मोठी जीवितहानी आणि दुर्घटना निश्चितपणे टाळता आली असती. कोट्यवधी रुपये खर्च करूनही जर नागरिकांचे आणि कर्मचाऱ्यांचे जीव जात असतील, तर या भ्रष्ट आणि निष्काळजी कारभाराला दोषी कोण आणि याची शिक्षा कोणाला मिळणार, असा संतप्त सवाल कविता आल्हाट पाटील यांनी उपस्थित केला असून दोषी अधिकाऱ्यांवर कडक कारवाईची मागणी केली आहे.

# सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाचा घरकुल परिसराला फटका

## नागरिकांसह शेतकऱ्यांचे मोठे नुकसान, आंदोलनाचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

येथील सेक्टर क्रमांक १७ मधील जॉगर्स पार्क परिसरात असलेल्या महानगरपालिकेच्या सांडपाणी जलशुद्धीकरण प्रकल्पातून (एसटीपी) मैलायुक्त व अशुद्ध पाण्याचा विसर्ग होत असल्यामुळे लगतच्या घरकुल परिसराला याचा मोठा फटका बसला आहे.

एसटीपी प्रकल्पाच्या पाण्याचे योग्य नियोजन नसल्याने या भागातील घरांमध्ये १०-१० फुटांपर्यंत पाणी साचत असून नागरिकांचे नुकसान होत आहे. वारंवार तक्रारी करूनही प्रशासन याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप स्थानिक लोकप्रतिनिधी आणि नागरिकांकडून केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर नुकतीच पालिका अधिकाऱ्यांची एक बैठक पार पडली, ज्यात प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा तीव्र निषेध करण्यात आला. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी येत्या आठ दिवसांत आयुक्तांसोबत विशेष बैठक घेऊन, स्पाईन रोडवरून नवीन पाईपलाईन टाकून हे पाणी घरकुल परिसराबाहेरून वळवण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले आहे. दरम्यान, गेल्या १० वर्षांपासून घरकुलवासीयांसह स्थानिक शेतकऱ्यांच्या शेतीचेही यामुळे मोठे नुकसान होत असून, त्यांना तात्काळ भरपाई न मिळाल्यास



> गेल्या १० वर्षांपासून घरकुल प्रकल्पाच्या बाजूला असणाऱ्या घरांचे व शेतीचे एसटीपी प्लांटच्या ओव्हरफ्लो पाण्यामुळे नुकसान होत आहे, शेतकऱ्यांचेही नुकसान होत आहे. प्रशासनाला आता आम्ही आणखी वेळ देणार नाही. घरकुलवासीय आणि शेतकऱ्यांना न्याय मिळालाच पाहिजे, अन्यथा आम्हाला पुढील पाऊल उचलावे लागेल.
>
> - कुंदन गायकवाड, नगरसेवक

> प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे दरवर्षी घरकुलमधील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना या समस्येचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे. माझी नुकतीच फ.प्रभागातील अधिकाऱ्यांसह बैठक झाली असून आयुक्तांसोबत ८ दिवसांत बैठक ठरवून स्पाईन रोडने नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम तातडीने मंजूर करून घेतले जाईल. तसेच, ज्या नागरिकांचे नुकसान झाले भरून द्यावे, अशी आमची ठाम मागणी आहे.
>
> - निलेश नेवाळे, नगरसेवक

> यापूर्वी सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क आणि जुन्या नकाशांच्या आधारे परिसराचे सर्वेक्षण व अभ्यास करण्यात आला आहे. पावसाचे प्रमाण जास्त झाल्यास सध्याच्या यंत्रणेवर अतिरिक्त भार पडतो. त्यामुळे आता वरच्या भागातील पाणी थेट घरकुलमध्ये येऊ न देता, ते स्पाइन रोडवरून पुढे वाहून नेण्याचे नियोजन आहे. अमृत योजनेअंतर्गत पाईपलाईनची कामे पूर्ण झाली असली, तरी अतिवृष्टीच्या काळात पाण्याचा निचरा योग्य गतीने होण्यासाठी हा नवीन ओपन नाला अत्यंत महत्त्वाचा ठरणार असून, यामुळे भविष्यात घरकुल परिसरातील पाणी साचण्याची समस्या पूर्णपणे सुटेल.
>
> - अजय सूर्यवंशी, सह शहर अभियंता

# शहरातील पाणीकपात रद्द होणार? सोमवारी होणार अंतिम निर्णय

## पालखी सोहळ्यानिमित्त 12 जुलैपर्यंत पाणीकपात तात्पुरती स्थगित; 13 जुलैच्या बैठकीत नियमित पाणीपुरवठ्यावर शिक्कामोर्तब होण्याची चिन्हे.

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांतील पाणीसाठा ६० टक्क्यांवर पोहोचल्याने महापालिकेकडून शहरात सुरू असलेली दिवसाआड पाणीकपात मागे घेतली जाण्याची शक्यता आहे. याबाबतचा निर्णय पुढील आठवड्यात सोमवारी होण्याची शक्यता असल्याची माहिती सूत्रांकडून देण्यात आली. खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील शिल्लक पाणीसाठा ३.९० टीएमसीपर्यंत खाली आल्यानंतर हे पाणी ऑगस्टअखेरपर्यंत पुरेल, या दृष्टीने नियोजन करण्याचा निर्णय घेऊन महापालिकेने १५ जूनपासून शहरात दिवसाआड पाणीकपात सुरू केली होती.

त्यानंतर जूनअखेरपर्यंत धरणांच्या पाणलोट क्षेत्रात समाधानकारक पाऊस न झाल्याने धरणांतील पाणीसाठा ३.५६ टीएमसीपर्यंत खाली आला होता. मात्र, त्यानंतर अवघ्या आठ दिवसांत धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणसाठा तब्बल १७ टीएमसीपर्यंत वाढला आहे, तसेच जुलैअखेर आणि ऑगस्ट महिन्यातही चांगल्या पावसाचा अंदाज असल्याने यंदाही धरणे पूर्ण भरण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरात सुरू असलेली पाणीकपात मागे घेतली जाण्याची शक्यता सूत्रांनी व्यक्त केली आहे.

महापालिका प्रशासनाकडून पालखी सोहळ्याच्या निमित्ताने ७ ते १२ जुलै या कालावधीसाठी पाणीकपात तात्पुरती मागे घेण्यात आली आहे. त्यानंतर धरणांतील उपलब्ध पाणीसाठ्याची स्थिती पाहून पाणीकपात कायम ठेवायची की पूर्णपणे मागे घ्यायची, याबाबत निर्णय घेतला जाणार आहे. त्यासाठीची बैठक सोमवारी (दि. १३) होण्याची शक्यता आहे. सध्या धरणांतील पाणीसाठा मागील वर्षीच्या साठ्याच्या जवळपास पोहोचला आहे, तसेच पुढील काळातील पाऊस लक्षात घेऊन धरणांमध्ये पाणीसाठवण क्षमतेसाठी जागा उपलब्ध ठेवणेही आवश्यक आहे. ही बाब विचारात घेऊन या बैठकीत पाणीकपातीबाबत अंतिम निर्णय घेतला जाणार आहे. दरम्यान, धरणांतील पुरेशा पाणीसाठ्यामुळे पाणीकपात पूर्ण मागे घेण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे.



### धरणसाठा किती वाढला?

» खडकवासला धरणसाखळीतील पाणीसाठ्यात अवघ्या आठ दिवसांत मोठी वाढ झाली आहे. जूनअखेरीस धरणांमध्ये केवळ ३.५६ टीएमसी पाणी शिल्लक होते. त्यामुळे ऑगस्टअखेरपर्यंत पाणी पुरवण्यासाठी महापालिकेला १५ जूनपासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू करावा लागला होता. मात्र जुलैच्या सुरुवातीला झालेल्या मुसळधार पावसामुळे धरणांमध्ये सुमारे १७ टीएमसी पाणीसाठा झाला आहे. हा साठा एकूण क्षमतेच्या सुमारे ६० टक्क्यांपर्यंत पोहोचला असून, पुढील पावसाचा अंदाजही समाधानकारक असल्याने पाणीकपात मागे घेण्याची शक्यता बळावली आहे.

### १३ जुलैच्या बैठकीत काय ठरणार?

» महापालिकेने पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर ७ ते १२ जुलैदरम्यान दिवसाआड पाणीकपात तात्पुरती स्थगित केली आहे. आता १३ जुलै रोजी होणाऱ्या बैठकीत धरणांतील उपलब्ध पाणीसाठा, हवामान विभागाचा पुढील पावसाचा अंदाज आणि शहराच्या पाणीगरजा यांचा आढावा घेतला जाणार आहे. त्यानंतर दिवसाआड पाणीपुरवठा कायम ठेवायचा की पूर्णपणे पूर्ववत करायचा, याबाबत अंतिम निर्णय होईल. त्यामुळे पुणेकरांच्या नजरा या बैठकीकडे लागल्या आहेत.

### नागरिकांची एकमुखी मागणी

» धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा झाल्यामुळे शहरातील दिवसाआड पाणीकपात पूर्णपणे रद्द करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. गेल्या काही आठवड्यांपासून पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या अनेक भागांतील रहिवाशांना नियमित पाणीपुरवठ्याची अपेक्षा आहे. दुसरीकडे, प्रशासनाला आगामी पावसाळ्यात धरणांमध्ये अतिरिक्त पाणी साठवण्यासाठी जागाही उपलब्ध ठेवावी लागणार आहे. त्यामुळे पाणीकपात मागे घेताना दीर्घकालीन जलनियोजनाचा विचार करूनच निर्णय घेण्याची गरज महापालिका प्रशासनासमोर आहे.

# पुण्यात वारीचा महाउत्सव! महापौर मंजुषा नागपुरे यांच्याकडून दोन्ही पालख्यांचे पारंपरिक औक्षण

## स्वच्छता, आरोग्य आणि चोवीस तास पाणीपुरवठा; 'पुणे प्रथम-सेवावारी 2026' उपक्रमांतर्गत महापालिकेकडून वारकऱ्यांसाठी खास सुविधा.

**पुणे | प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यांचे गुरुवारी पुण्यात भक्तिमय वातावरणात उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. महापौर मंजुषा नागपुरे यांनी कळस आणि बोपोडी येथे दोन्ही पालख्यांचे पारंपरिक पद्धतीने औक्षण करून पादुकांचे दर्शन घेतले. या वेळी पुणे प्रथम- सेवावारी २०२६ उपक्रमांतर्गत पालख्यांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. महापौर नागपुरे यांनी वारकरी बांधवांशी संवाद साधत त्यांच्या भावना जाणून घेतल्या, तसेच वारकरी महिलांसमवेत फुगडी खेळून वारीतील समता, भक्ती आणि सेवाभावाचा संदेश दिला. या वेळी उपमहापौर परशुराम वाडेकर, विरोधी पक्षनेते अॅड. निलेश निकम, राष्ट्रवादी गटनेते सोपान चव्हाण, पक्षनेते नितीन गावडे, महापालिका आयुक्त नवलकिशोर राम, स्थानिक लोकप्रतिनिधी, महापालिकेचे अधिकारी, तसेच मोठ्या संख्येने वारकरी आणि नागरिक उपस्थित होते.

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यात आगमन हा प्रत्येक पुणेकरासाठी अभिमानाचा क्षण आहे. वारकरी बांधवांची सेवा हीच संतसेवा मानून महापालिकेचे सर्व विभाग पुणे प्रथम-सेवावारी २०२६ अंतर्गत अहोरात्र कार्यरत आहेत. स्वच्छता, आरोग्य, पाणीपुरवठा आणि सुरक्षेसह सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या असून, संतांनी दिलेला समता आणि बंधुतेचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी आम्ही कटिबद्ध असल्याच्या भावना महापौर नागपुरे यांनी व्यक्त केल्या.



### 'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' उपक्रम

» पुणे महापालिकेने यंदाच्या पालखी सोहळ्यासाठी 'पुणे प्रथम-सेवावारी २०२६' हा विशेष उपक्रम राबविला आहे. या उपक्रमांतर्गत पालखी मार्गावर स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, फिरती शौचालये, वैद्यकीय पथके आणि सुरक्षेची व्यापक व्यवस्था करण्यात आली आहे. पालख्यांच्या स्वागतावेळी पुष्पवृष्टी करण्यात आली. महापालिकेचे विविध विभाग आणि अधिकारी वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये यासाठी चोवीस तास कार्यरत असून, संतांच्या समता, सेवा आणि बंधुभावाच्या विचारांना कृतीतून जपण्याचा प्रयत्न प्रशासनाकडून केला जात आहे.

# धरणसाखळीत 55.49 टक्के पाणीसाठा; गेल्या 24 तासांत सव्वा टीएमसीची भर

## मुठा नदीतील विसर्ग बंद तर उजनीला 1.51 टीएमसी अतिरिक्त पाण्याचा लाभ

**पुणे | प्रतिनिधी**


खडकवासला धरण साखळीतील रायगड जिल्ह्याच्या हद्दीवरील घाट माथ्यासह पानशेत मुठा खोऱ्यात गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाचा जोर गुरुवारी (दि.९) ओसरला. सायंकाळी पाच वाजता धरण साखळीत १६.१७ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजे ५५.४९ टक्के पाणीसाठा झाला होता. गेल्या २४ तासांत धरणांत सव्वा टीएमसीची भर पडली आहे.

खडकवासला भागात गुरुवारी दिवसभर पावसाने उघडीप दिली. मात्र, घाट माथ्यासह पानशेत, वरसगाव, टेमघर खोऱ्यात पावसाळी वातावरण कायम असून, रिमझिम सुरू आहे. नद्या-ओढे नाल्यांतून पाण्याचे प्रवाह सुरूच आहेत. त्यामुळे धरण साखळीच्या पाणीसाठ्यात भर पडत आहे.

धरण साखळीत बुधवारी (दि.८) सायंकाळी पाच वाजता १४.९५ टीएमसी इतका पाणीसाठा होता. मात्र, पावसाचा जोर कमी झाल्याने खडकवासला धरणातून मुठा नदीपात्रातील विसर्ग बुधवारी रात्री साडेदहा वाजता बंद करण्यात आला आहे. मुठा कालव्यात, तसेच पुण्यासाठी सोडण्यात येत असलेल्या पाण्याची तूट भरून खडकवासला धरणाची पातळी स्थिर आहे.

पानशेत, वरसगाव धरण माथ्यासह खडकवासला भागात पावसाने उघडीप दिली. मात्र, पानशेत मुठा खोऱ्यात रिमझिम सुरू आहे. बुधवारी (दि.८) सकाळी सहा ते गुरुवारी सकाळी सहा वाजेपर्यंत १२७, तर पानशेत येथे ६२, वरसगाव येथे ५४ व खडकवासला येथे १४ मिलिमीटर पाऊस पडला.

पुणे शहर परिसराला पिण्यासाठी एक महिना पुरेल इतके १.५१ टीएमसी जादा पाणी खडकवासला धरणातून मुठा नदीत सोडण्यात आले. या पाण्याचा लाभ उजनी धरणाला झाला आहे. धरण क्षेत्रातील अतिवृष्टीमुळे मंगळवारी (दि. ७) रात्री बारा ते बुधवारी (दि. ८) रात्री साडेदहा वाजेपर्यंत अवघ्या साडेबावीस तासांत हे पाणी सोडण्यात आले.



### ४१२ कोटींच्या कामांना मंजुरीची प्रतीक्षा

» खडकवासला धरण साखळीत गुरुवारी (९ जुलै) सायंकाळी पाच वाजेपर्यंत १६.१७ टीएमसी (५५.४९ टक्के) पाणीसाठा नोंदविण्यात आला. गेल्या चार दिवसांपासून सुरू असलेल्या पावसामुळे धरणांमध्ये सातत्याने पाण्याची आवक झाली. मात्र गुरुवारी पावसाचा जोर कमी झाल्याने विसर्गही नियंत्रित करण्यात आला. पानशेत, वरसगाव आणि टेमघर परिसरात रिमझिम सुरू असल्याने पुढील काही दिवसांतही साठ्यात वाढ होण्याची शक्यता आहे. वाढत्या पाणीसाठ्यामुळे पुणे शहराच्या पिण्याच्या पाण्याबाबतची चिंता मोठ्या प्रमाणात कमी झाली असून प्रशासन परिस्थितीवर सतत लक्ष ठेवून आहे.

### पावसाचा जोर कमी, नदीतील विसर्ग थांबला

» गुरुवारी खडकवासला परिसरात पावसाने उघडीप दिल्यामुळे मुठा नदीपात्रातील विसर्ग बुधवारी रात्री साडेदहा वाजता बंद करण्यात आला. यापूर्वी अतिवृष्टीमुळे धरणातून मोठ्या प्रमाणावर पाणी सोडण्यात आले होते. सध्या पुण्याच्या पिण्याच्या पाण्याची गरज आणि मुठा कालव्याचा पुरवठा सुरळीत ठेवत धरणाची पातळी स्थिर ठेवण्यात येत आहे. घाटमाथ्यावर अजूनही हलका पाऊस सुरू असल्याने नद्या आणि ओढ्यांमधून धरणात पाण्याची आवक कायम आहे. त्यामुळे आवश्यकतेनुसारच पुढील विसर्गाचा निर्णय घेतला जाणार आहे.

### उजनी धरणाला १.५१ टीएमसी पाण्याचा लाभ

» खडकवासला धरणातून मंगळवारी मध्यरात्रीपासून बुधवारी रात्रीपर्यंत अवघ्या साडेबावीस तासांत १.५१ टीएमसी पाणी मुठा नदीत सोडण्यात आले. या अतिरिक्त विसर्गाचा थेट लाभ उजनी धरणाला झाला. धरण क्षेत्रातील अतिवृष्टीमुळे हा विसर्ग करावा लागला होता. आता पावसाचा जोर कमी झाल्याने नदीतील विसर्ग थांबविण्यात आला असला तरी धरणांमध्ये सातत्याने होणाऱ्या आवकेमुळे जलसाठा समाधानकारक पातळीवर पोहोचत आहे. पुढील पावसाच्या स्थितीनुसार जलसंपदा विभाग आवश्यक ते नियोजन करून धरणांचे व्यवस्थापन करणार आहे.

---

# ‘रेडीमिक्स प्लांट्स’मुळे जीवन जगणे झाले अवघड; उंड्रीतील संतप्त नागरिकांची भावना

## खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत रहिवाशांनी आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे निवेदन देत तातडीने प्लांट्स बंद

**पुणे | प्रतिनिधी**

उंड्री परिसरातील निवासी भागात सुरू असलेल्या बेकायदेशीर रेडीमिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्लांट्समुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असून, अवजड वाहनांमुळे रस्त्यांची देखील दुरवस्था झाली आहे.

त्यामुळे या प्लांट्सवर तातडीने कारवाई करून ते बंद करण्यात यावेत, अशी मागणी उंड्रीतील संतप्त रहिवाशांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे निवेदनाद्वारे केली. नागरिकांच्या शिष्टमंडळाने खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत नुकतीच आयुक्तांची नुकतीच भेट घेतली.

गेल्या दीड वर्षांपासून विविध शासकीय यंत्रणांकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस कारवाई होत नसल्याने निवासी भागात सुरू असलेल्या या प्लांट्समुळे आरोग्य आणि सुरक्षितता धोक्यात आल्याचे या वेळी रहिवाशांनी सांगितले. आयुक्तांनी संबंधित प्लांट्सबाबत माहिती नसल्याचे सांगितल्याचा दावा रहिवाशांनी केला.

रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, या प्लांट्समधून होणाऱ्या धूळप्रदूषणामुळे परिसरातील नागरिकांमध्ये श्वसनाचे विकार वाढत आहेत. तसेच दिवस-रात्र सुरू असलेल्या सिमेंट मिक्सर आणि डंपरच्या वाहतुकीमुळे रस्ते उद्ध्वस्त झाले असून, खड्डे, रस्त्यावर पडलेली खडी आणि निष्काळजी वाहनचालकांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. अनेक दुचाकीस्वार अपघातग्रस्त झाल्याचा दावाही त्यांनी केला.

'आम्ही प्रदूषित हवेत श्वास घेत असल्याने आमचे आरोग्य धोक्यात आले आहे. रस्ते मृत्यूचे सापळे बनले आहेत. संबंधित यंत्रणा आणि लोकप्रतिनिधींनी याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी या वेळी नागरिकांनी केली.

टाटा इनोरा पार्क, गोदरेज प्राणा, गोदरेज ग्रीन्स आणि मयूरी सोसायटीसह परिसरातील रहिवाशांनी या बेकायदेशीर रेडीमिक्स प्लांट्सवर तातडीने कारवाई करून ते कायमस्वरूपी बंद करण्याची मागणी केली आहे.मोठी दुर्घटना किंवा गंभीर आरोग्य समस्या उद्भवण्यापूर्वी महापालिका आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पर्यावरणीय नियमांची कठोर अंमलबजावणी करणे गरजेचे असल्याचे या वेळी रहिवाशांनी सांगितले.



### आरएमसी प्लांट्समुळे आरोग्य धोक्यात

» उंड्री परिसरातील निवासी भागात सुरू असलेल्या बेकायदेशीर रेडीमिक्स कॉंक्रीट (आरएमसी) प्लांट्समुळे नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत असल्याचा आरोप रहिवाशांनी केला आहे. या प्लांट्समधून होणाऱ्या धूळप्रदूषणामुळे श्वसनाचे विकार वाढत असून, दिवस-रात्र सुरू असलेल्या डंपर आणि सिमेंट मिक्सरच्या वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरवस्था झाली आहे. खड्डे, रस्त्यावर पडलेली खडी आणि निष्काळजी वाहनचालकांमुळे अपघातांचा धोका वाढल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. टाटा इनोरा पार्क, गोदरेज प्राणा, गोदरेज ग्रीन्स आणि मयूरी सोसायटीतील रहिवाशांनी महापालिकेकडे तातडीने कारवाई करून प्लांट्स बंद करण्याची मागणी केली आहे.